# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर,वसई-विरार
## यांचे कार्यालय

सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन,मिरा-रोड(पुर्व),ठाणे.४०११०७

फोन नंबर-०२२-२९४५१००३.

Email ID-pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


दिनांक :- ०६/०३/२०२१

## "प्रेसनोट क्र.५१ "

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १४१/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३९२ सह आर्म ॲक्ट ३, २५ प्रमाणे दि. ०१.०३.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील आरोपीने बंदुकीचा धाक दाखवुन फिर्यादी यांचे "रविना गोल्ड" नावाचे दुकान, नवघर रोड, भाईंदर पुर्व येथुन दि. ०१.०३.२०२१ रोजी १) ०१,७०,०००/- रु. रोख रक्कम, २) १५,७५,०००/-रु. किं.चे ४५० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगड, ३) ४,०००/- रु.किं.चा सॅमसंग जे २ कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण १७,४९,०००/- रु. चा मुद्देमाल चोरी करुन नेला होता.

सदर गुन्हयातील आरोपी हा व्यवसायाने चांदीचा व्यवसाय करणारा असून त्याने भाईदर पुर्व परिसरात फिर्यादी यांचे दुकानावर पाळत ठेवुन चोरीचे उद्देशाने नमुद गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा हा बंदुकीचा धाक दाखवुन जबरी चोरी करणे असा गंभीर स्वरुपाचा असल्याने तो लवकरात लवकर उघडकीस आणन्याकरीता नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा भाईंदर, मिरारोड, वसई, व नालासोपारा येथे जावुन परिसरातील संपुर्ण सीसीटिव्ही यंत्रणेच्या आधारे गुन्हयाचा तांत्रीक तपास केला तसेच आरोपीने नवघर, मिरारोड, वसई व नालासोपारा याठिकाणी वापरलेल्या विविध ॲटो रिक्षाड्रायव्हर ने आरोपीचे मार्गाबाबत व ठावठिकाणाबाबत दिलेल्या माहितीचे आधारे आरोपीला अटक करण्यात आली आहे. **आरोपीताकडुन तपासादरम्यान रु. ०१,७०,०००/- रोख रक्कम, व ४५० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगड किंमत रु. १५,७५,०००/- असा एकुण रु. १७,४५,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.तसेच गुन्हयातील वापरलेली बंदुक सुध्दा हस्तगत करण्यात आली आहे.** गुन्हयात हस्तगत केलेली बंदुक ही एअर गन आहे असे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, मा. सहा. पो. आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/भास्कर पुल्ली, सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२४८८ प्रशांत वाघ, पोशि/३३५९ निलेश शिंदे, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केला आहे.

Scanned with CamScanner